**नियमित दिवाणी दावा क्र.९३३/२०२४ मधील निशाणी क्र.१५ वरील आदेश**

(सुकुमार व इतर वि राजाराम व इतर)

(CNR NO.MHLA060027682024)

सदरचा अर्ज प्रतिवादी क्र.१ व २ यांच्याविरुद्ध दि. १९.०७.२०२५ रोजी झालेला 'विना कैफियत' दावा चालविण्याचा आदेश रद्द होण्यासाठी दाखल केलेला आहे.

**२.** अर्ज व त्यावरील वादी यांच्या म्हणण्याचे अवलोकन केले.

**३.** प्रतिवादी क्र.१ व २ यांनी अर्जात असे कथन केले आहे की, वादी व प्रतिवादीमध्ये तडजोड झाली असून ती त्यांच्यासाठी अंतीम न्याय होणारी आहे व कायमचा प्रश्न व भांडणतंटे संपुष्टात येणारी आहेत. प्रतिवादी व वादींमध्ये या पुर्वीपासूनच तडजोड करण्याचा प्रयत्न चालू असल्याने प्रतिवादी यांनी लेखी जबाबदावा दाखल केलेला नव्हता ही वस्तुस्थिती आहे. सबब, त्यांनी अर्ज मंजूर होण्याची विनंती केली आहे.

**४.** वादी यांनी त्यांच्या म्हणण्यामध्ये अर्जास आक्षेप नोंदवलेला आहे.

**५.** अर्ज दि.०९.०३.२०२६ रोजीचा आहे. प्रतिवादी क्र.१ व २ यांना दि. २१.०३.२०२५ रोजी समन्सची बजावणी झालेली आहे. प्रतिज्ञापत्राद्वारे समर्थित अर्जामध्ये नमुद केलेले कारण लक्षात घेता विलंब संयुक्तीक वाटतो. परंतु, विलंबामुळे दाव्याचे कामकाज लांबणीवर पडलेले आहे. म्हणून, अर्ज खर्चासह मंजुर होण्यास पात्र आहे. सबब, पुढीलप्रमाणे आदेश;

**आदेश**

१. अर्ज रक्कम रुपये १,०००/— खर्चासह मंजुर करण्यात येत आहे. खर्चाची रक्कम वादी क्र.१ व २ यांना प्रतिवादी क्र.१ व २ यांनी समान देण्यात यावी.

२. प्रतिवादी क्र.१ व २ विरुद्ध दिनांक १९.०७.२०२५ रोजी झालेला 'विना कैफियत' दावा चालविण्याचा आदेश रद्द करण्यात येतो.

Digitally signed by WADGAONKAR SWANANDI DEVIDAS
Date: 2026.03.12 10:57:17 +0530

दि.०९.०३.२०२६.

**(स्वानंदी दे. वडगांवकर)**
सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
अहमदपूर, जि.लातूर.